UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume - 10 : Issue-1 (January-2024)
ISSN 2455-4375

# छत्रपती शाहू महाराजांचे व्यवसायिक विचार व कार्ये

**(Business Thoughts and Actions of Chhatrapati Shahu Maharaj)**

**डॉ. मनोज मकरंद जंत्रे**
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी
जि.यवतमाळ.
ई–मेल – manoj.jantre@gmali.com

---

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडण–घडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल असा वाटा आहे. बहुजन समाजाचा उध्दार करणा-या महात्मा फुलेंचा वारसा चालविणारा राजा म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासामध्ये त्यांचे एक अलौकिक स्थान आहे. तत्कालीन इतर संस्थानिकांप्रमाणे राजैश्वर्यांच्या सुखोपभोगात न रमता ''राजसत्ता हे समाजसेवेचे साधन आहे'' या तत्वाने जगणारा लोकांचा राजा छत्रपती शाहु महाराज बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, दलितोध्दार, अस्पृश्यता निवारण, जातीभेद निवारण, व्यापार, उद्योग–धंदे, सहकार, इत्यादी अनेक सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणण्याकरीता सातत्याने आघाडीवर राहणारा एकच राजा म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज होय. म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचा उल्लेख ''सामाजिक लोकशाहीचा आधार'' अशा शब्दामध्ये केला आहे.

युरोपीय समाजाने जागतिक आघाडी घेतली होती, त्यांची महाराजांना जाण होती. व्यापार–उद्योगात आपण मागे असल्यामुळे आपले भयानक आर्थिक शोषण होवून आपले पारतंत्र्य अधिक दुःखदायक झालेले आहे. म्हणून मराठी माणसांनी उद्योगधंद्यात शिरावे व आपल्याबरोबर देशाचीही प्रगती साधावी. तसेच खामगाव येथील अधिवेशनामध्ये एक इच्छा व्यक्त केली होती की, ''आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार–धंदे व इतर उच्चप्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरुरी आहे.'' यावरुन असे लक्षात येईल की, शाहू महाराजांनी स्वतःच्या दुरदृष्टीतुन ''विना व्यापार – उद्योग – सहकार नाही उध्दार'' हे जाणले होते. शाहू महाराजांनी गादीवर आल्यानंतर संस्थानातील लोकांनी उद्योगधंदे व व्यापार या क्षेत्रामध्ये उतरावे त्याकरीता कोल्हापूर संस्थान आवश्यक ती मदत करण्यास तयार आहे असे शाहू महाराजांनी जाहिर केले.

**व्यापार–उद्योग–धंद्याविषयक विचार व कार्ये :**

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचे व व्यवहारांचे प्रतिबिंब स्पष्टपणे त्यांच्या उद्योगधंद्यासंबंधीच्या धोरणात दिसते. उद्योग–धंदे काढणे व चालविणे हे राजाचे काम नाही, अशा विचारांचे प्रभाव असलेला तो काळ होता. उद्योग, व्यवसाय, धंदे, व्यापार इ. आर्थिक व्यवहार वाढविण्याचे काम शासनाचे नाही असे मानले जाई. ब्रिटिशांचे भारतातील धोरणही तसेच होते. भारतात उद्योगधंदे वाढविण्यावर त्यांचा भर नव्हताच. अशा काळात शाहू महाराजांचे या संबंधीचे विचार महत्वाचे वाटतात. शाहू महाराजांनी एका भाषणामध्ये असे म्हटले आहे की, ''आर्थिक संपन्नता औद्योगिकरणावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी बाजारपेठांची व्यवस्था राबविली पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरीता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे. कारखानदारीच्या क्षेत्रातील मक्तेदारी, भांडवलशाही आणि तिच्यावर श्रमिक आणि इतर जन यांनी पूर्णपणे अवलंबून असणे, रास्त नव्हे. अशा प्रकारची व्यवस्था भारतात मुळीच योग्य नाही. उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यास खेड्यांतून येणा-या लोंढ्यामुळे शहरात गर्दी होऊन आर्थिक व

सामाजिक दुष्परिणाम उद्‌भवतात ते टाळण्यासाठी विकेंद्रीकरणाची गरज आहे'' असे शाहू महाराजांचे सहकार, उद्योग–धंदे या विषयीचे मत होते.

शाहू महाराजांची प्रसिध्दी बोलके सुधारक म्हणून नाही तर कर्ते सुधारक म्हणूनच आहे आणि ती बरोबरच आहे. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणासंबंधीच्या उपरोक्त विचारांवर आधारित व्यवहारही त्यांनी त्यांच्या संस्थानात केला. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील पाटबंधा-यांच्या योजनांसाठी असे जलसंपत्तीचे सर्वेक्षण करुन घेतले होते, तसे संस्थानात नवे उद्योग सुरु करण्याच्या दृष्टीने औद्योगिक सर्वेक्षणही करुन घेतले होते. हे सर्वेक्षण आधारभूत धरुन त्यांना मोठ्याकल्पकतेने स्वतः अनेक नवे उद्योग सुरु केले तर काही उद्योग लोकांनी सुरु करावेत म्हणून त्यांना प्रोत्साहन व चालना दिली त्यामुळे 1905 मध्ये कोल्हापूर संस्थानात सुगंधीत औषधी तेल–उद्योग (Essential oil Industry), मधूमक्षिका पालन–उद्योग (Bee-Keeping Industry)] काष्ठार्क–उद्योग (Wood furtiliz Industry)] आणि सुती कापड–उद्योग (Cotton Textile Industry) सुरु केले गेली.

सन 1905 साली संस्थानातील काही व्यापा-यांनी एक ''जॉइंट स्टॉक कंपनी'' स्थापन केली व त्यामार्फत सूत गिरणी सुरु केली. शाहू महाराजांनी या कंपनीच्या भाग भांडवलात दरबारची बरीच रक्कम गुंतविली. खूप मोठी जमीन मोफत दिली, आणि पाणीपुरवठासुध्दा मोफत पुरविला. शेजारचे एक तळे यासाठी मोफत दिले. या सूत गिरणीचा पायाभरणी समारंभ शाहू महाराजांच्याच हस्ते झाला आणि या गिरणीला नावसुध्दा त्यांचेच देण्यात आले. कोल्हापूरची ''शाहू मिल'' ही तीच गिरणी. सन 1910–11 साली या गिरणीतून उत्पादन सुरु झाले. अंतर्गत मतभेदामुळे 1915–16 साली ही संस्थानच्या मालकीची बनविली गेली. सन 1928 सालापर्यंत या गिरणीत फक्त सूत उत्पादन होत असे. पुढे कापड निघू लागले. सन 1908–09 या वर्षात इचलकरंजीस एक जिनींग फॅक्टरी सुरु करण्यात आली. 1912–13 पर्यंत त्यांची संख्या सहा झाली. ती सुध्दा एका गावात नव्हे. कोल्हापूरात 2, इचलकरंजीत 1, शिरोळला 1, चिंचलीला 1 आणि गडहिंग्लजला 1 अशा विविध ठिकाणी फॅक्ट-या सुरु झाल्या. या सर्व ठिकाणी महाराजांनी सर्व प्रकारे मदत केली.

सन 1912–13 साली रायबाग येथे ''शाहू वीव्हर्स असोसिएशन'' या नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. धंद्यात अपयश आलेले अनेक विणकर, कामगार गाव सोडून विखुरले होते. या सर्वांना एकत्र करण्यात आले. सुमारे 160 स्त्री–पुरुष विणकर या संस्थेचे सभासद होते. विणकरांनी गाव सोडू नये म्हणून महाराजांनी त्यांना बिनव्याजी कर्ज दिले, राहण्यासाठी जागा दिली. थोडीथोडी रयतावा जमीन दिली. तिथे साड्या, धोतरे, खण, चादरी इ. तयार होत. ह्या मालाला दरबार मागणी कमी पडू देणार नाही, अशी स्पष्ट हमी महाराजांनी दिली.

**व्यापार–उद्योगास सक्रिय उत्तेजन :**

आर्थिक सुबत्तेसाठी व्यापारउदीम वाढला पाहिजे आणि त्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत, अशी शाहू महाराजांची भूमिका असल्याचे दिसते. शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानात उद्योगधंद्यातून किंवा कारखान्यांमधून तयार होत असलेल्या मालाच्या व्यापाराचा प्रश्न महत्वाचा नव्हता. कारण त्या प्रकारच्या मालाचे उत्पादन अतिमर्यादित होते. परंतू शेती उत्पन्न वस्तूंच्या व्यापाराचा प्रश्न निश्चितच होता. कोल्हापूरच्या व्यापारपेठेचे जनकत्व सुध्दा शाहू महाराजांकडेच जाते. त्यांच्या काळी तुलनात्मकदृष्ट्या निपाणी येथे व्यापार जास्त चालत असल्याचे दिसते. एकदा महाराजांनी निपाणीच्या व्यापा-यांना कागल येथे बोलावून घेतले आणि त्यांच्याशी कोल्हापूर शहरात व्यापारपेठ बसविण्यासंबंधी विचारविनिमय केला. राज्यरोहनानंतर दुस-याच वर्षी रेल्वे स्टेशन जवळच्या जमिनीवर शाहूपूरी ही नवी बाजारपेठ वसवली. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गास

खास सवलती देवून, वखारी घालण्यास प्रोत्साहन देण्यात आले. पाच ते सात वर्षांमध्येच ही बाजारपेठ जोमाने उभी राहली. सन 1902 मध्ये ही बाजारपेठ मोठ्या भरभराटीत आली. महाराजांच्या एका पत्रामध्ये असे कळविण्याचा आशय आहे की, दरवर्षी 80 लाखांचा गुळ व 20 लाखांची भुईमुंग निर्यात करण्यात येते.

आजही कोल्हापूर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते. ह्याच प्रकारे महाराजांनी वडीलांच्या स्मरणार्थ शिरोळ रेल्वे स्टेशनच्या जवळ इ. स. 1917 मध्ये आणखी एक बाजारपेठ स्थापन केली त्याचे नाव जयसिंगपूर असे ठेवण्यात आले. तेथील व्यापा-यांना भांडवल म्हणून 3000/- रुपये पाच वर्षांसाठी बिनव्याजी दिले. एवढेच नव्हे तर विणकारांच्या जातींना वस्ती करण्यास चाळीस कुटूंबास घरासाठी खुली जागा व व्यवसायासाठी प्रत्येकी 150/- देणगी म्हणून दिली. त्यामुळे व्यापारी बाजारपेठेमधून धोतरे, लुगडी, चोळखण या कापडाविषयी महाराष्ट्रामध्ये कोल्हपूर प्रसिध्दीस आले.

**दळणवळणाबाबत शाहू महाराजांचे विचार व कार्ये :**

उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या वाढीसाठी दळणवळणाच्या साधनांचे, विशेषतः रेल्वे, रस्ते यांचे महत्व अनन्यसाधारण असते. सामाजिक अभिसरणासाठी सुध्दा हे अत्यावश्यक असते. शाहू महाराजांच्या कारकीर्दीची सुरुवात झाली तेव्हा संस्थानात रस्ते खूप अपुरे होते. असलेले रस्ते मुख्यतः संस्थानाबाहेरुन येऊन पुन्हा संस्थानाबाहेर जाणारेच होते. शाहू महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीत रस्ते बांधणीवर लक्ष दिले. त्यांच्या कारकीर्दीत 185 मैल लांबीचे नवे रस्ते तयार करण्यात आले. हा सर्व खर्च दरबारने केला. खेड्यांतील माल शहरात येऊन त्याला त्यातल्यात्यात योग्य दर-दाम मिळू लागला. शहरात निर्माण होणारा शेती उपयोगी व संसारोपयोगी माल खेड्यांत जाऊ लागला. अशाप्रकारे सामाजिक अभिसरण वाढले. भारतातील रेल्वे प्रदीर्घ काळ खाजगी मालकीचीच होती. कोल्हापूर संस्थानातील रेल्वे मात्र सरकारी क्षेत्रातच सुरु झाली. कोल्हापूर शहर मिरज रेल्वे जंक्शनला जोडणा-या रेल्वेचे काम सन 1888 साली शाहू महाराजांच्या हस्ते उदघाटन झाले. सन 1891 साली ते काम पूर्ण झाले. सर्व खर्च सरकारने केला. पुढे काही गुंतवणूक रेल्वेत होतच होती. सन 1906 अखेर एकूण गुंतवणूक 23 लाख 26 हजार रुपयांची झाली होती.

**सहकार विषयक विचार व कार्ये :**

आज महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात कोल्हापूर जिल्हा एक अग्रेसर जिल्हा आहे. त्याची सुध्दा स्पष्ट सुरुवात शाहू महाराजांच्या कारकीर्दीत झालेली आहे. सन 1912 साली त्यांनी ''सहकारविषयक कायदा'' केला आहे. आज नावारुपाला आलेली ''अर्बन को-ऑप. बँक'' आणि ''बलभीम को-ऑप. बँक'' या त्यांच्याच कारकीर्दीत स्थापन झालेल्या आहेत. 1920-21 सालीच कोल्हापूर संस्थानातील सहकारी सोसायट्यांची संख्या 37 होती.

या संदर्भात महाराजांच्या एका भाषणामध्ये महाराज म्हणतात. ''पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल, पैसा व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे. म्हणजे सहकार्य केले पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटूंब एका ठिकाणी काम करीत असे व येणारा नफा त्या कुटूंबातील माणसांना उपयोगी पडे. आता ही आपली कुटूंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. 10/20/25 कुटूंबे या उद्योगधंद्यासाठी एक झाली पाहिजेत. आपण सहकार्य करायला शिका, आपली सहकारी पतपेढी काढा, इतकेच नव्हे तर सहकारी कारखाने, सहकारी दुकानेही काढा.'' कोल्हापूर जिल्ह्याच्या आजच्या आर्थिक विकासातील व प्रगतीमधील जवळजवळ प्रत्येक गोष्ट शाहू महाराजांच्या कार्याशी व विचाराशी निगडीत आहे.

**शेती विषयक विचार व कार्ये :**

इतिहासामध्ये कोणत्याही कालखंडात कृषी आणि व्यापार–उद्योग ही समाजाच्या भौतिक प्रगतीची दोन महत्वाची चक्रे मानली गेली आहेत. कोल्हापूर संस्थानात आधुनिकीकरणाची ही प्रक्रिया शाहू महाराजांनी राबविली. देश–विदेशामध्ये शाहू महाराजांनी अभ्यासक दौरे केल्यामुळे त्यांना युरोपमध्ये शेती शास्त्रीय पध्दतीने होते, त्याचा अभ्यास चिकित्सक पध्दतीने त्यांनी केला. भारतामध्ये सन 1912 मध्ये शेती पध्दतीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी ''किंग ॲडवर्ड ॲग्रीकल्चर इंस्टिट्युट'' ह्या संस्थेची स्थापना केली. त्याचबरोबर कोल्हापूरमध्ये शेती अवजारांचे म्युझिम सुरु केले. शेतीकरीता लागणारे बी–बियाणे, अवजारे, रासायनिक खते, आणि आधुनिक मशागत पध्दतीचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी शेती अधिकारी यांची नेमणूक केली. त्याचबरोबर शेतकी प्रदर्शने भरवून त्याअंतर्गत शेतीविषयी माहितीपत्रके, आधुनिक साधने, उत्कृष्ठ उत्पादन कसे घेण्यात यावे ह्याची माहिती मिळावी त्याकरीता शेतकी प्रदर्शने, विज्ञान प्रदर्शने, जनावरांचे प्रदर्शन, आयोजित करुन संस्थानातील व संस्थानाबाहेरील जनतेस ज्ञान मिळावे हा एकमात्र उद्देश्य शाहू महाराजांचा होता.

**निष्कर्ष :**

अशारीतीने प्रजेची काळजी करणारा आणि उद्योगधंद्यात मदत करुन त्यांना स्वावलंबी बनण्यास सहकार्य करणारा दुसरा संस्थानिक भारतामध्ये शोधूनही सापडणे कठीण आहे. तपशीलवार उदाहरणे खूप देता येण्याजोगी आहेत. रंगाचे कारखाने, राळ तयार करण्याचा व्यवसाय, कात कराखाना, सूत रंगविण्याचे व्यवसाय, तेल गिरण्या इ. अनेक व्यवसाय शाहू महाराजांच्या काळात सुरु झाले. सन 1894 मध्ये शाहू महाराज गादीवर आले, तेव्हा संपूर्ण कोल्हापूर संस्थानात नाव घेण्यासारखा एकही मोठा उद्योग किंवा कारखाना नव्हता. त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी मात्र अनेक व्यवसाय, उद्योग, कारखाने सुरु झाले होते. उद्योग निघावेत, रोजगार वाढावा, उत्पादन वाढवावे, सुबत्ता वाढवावी, त्याचा लाभ सर्व भागांत व्हावा आणि या सर्व कामात संस्थानाचा सक्रिय आणि महत्वाचा सहभाग असावा, अशी त्यांची भूमिका होती, असा त्यांचा आर्थिक व्यवहार होता.

थोडक्यात शाहू महाराजाचे व्यवसायिक, आर्थिक विचार व कार्यावरुन असे लक्षात येते की, शाहू महाराजांनी महाराष्ट्राच्या आर्थिक जडण–घडणीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते. शाहू महाराजांनी शेती विषयक मांडलेले विचार व त्यांनी केलेली कार्ये आजही उपयुक्त ठरलेली आहेत. आज विकसीत झालेली विशेष आर्थिक क्षेत्र (एस. ई. झेड.) या संकल्पनेची एक छबी शाहू महाराजांच्या कार्यात दिसून येते. संस्थानातील रयतेस सर्व सुख सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून शाहू महाराजांनी विविध उद्योगाची स्थापना केली व त्यांच्या विकासाला आर्थिक मदत देवून प्रोत्साहित केले. शाहू महाराजांनी केलेल्या व्यापार, व्यवसाय व आर्थिक कार्यामुळे शाहू महाराजांच्या राज्यातील अर्थ व्यवस्थेला चालना मिळाली. त्यांच्या काळामध्ये शेती व व्यापाराचा विकास झाला आणि सहकार चळवळीला बळ मिळाले आणि तीचा विकास झाला. व्यवसायासाठी आवश्यक असणारे चार घटक म्हणजेच भूमी– भांडवल– श्रम व संयोजन यांचे व्यवस्थित मिश्रण करुन शाहू महाराजांनी स्वतःच्या संस्थानामध्ये व्यापार, विपणन, व्यवसाय व उद्योगधंदे इत्यादींना चालना दिली. तसेच उत्पादनासाठी आवश्यक असणा-या आदानांची (Input) उपलब्धता करुन, संबंधीत प्रदानांचा (Output) लाभ संबंध जनतेस मिळावून दिला. 21 व्या शतकात भारताला मार्गदर्शक असणारी ही आर्थिक धोरणाची सुत्र 1920 च्या जवळपास शाहू महाराजांनी सांगितली होती, हे या आर्थिक विचारांचे वैशिष्ट्य आहे.

**संदर्भ सूची :**


- डॉ. जयसिंग पवार, 2001, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
- माधव खंडेराव बागल, 1933, सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ, समता सैनिक दल नागपूर.
- हिंदुराव साळुंखे, 2001, राजर्षी शाहू महाराजा आणि मल्लविद्या, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
- प्रा. अशोक राणा, 2002, लोकांचा राजा शाहू छत्रपती, जिजाऊ प्रकाशन, पुणे.
- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1976.
- कृ. गो. सूर्यवंशी, 1984, राजर्षी शाहूरू राजा व माणूस.
- शितल मरकाम, 2007, त्रि– इब्लिशी– बहुजनों की आजादी के दुश्मन!, शोषित समाज जागरुकता मुहिम, नागपूर.
- प्रा. अशोक राणा, 2005, वेदोक्त प्रकरण व संत साहित्य, जिजाऊ प्रकाशन, पुणे.
- Dhananjay Keer, 1976, SHAHU CHHATRAPATI: A Royal Revolutionary, Bombay Papular Prakashan.